
# प्रकाश प्रवहन

भाग ४ अंक २ — द्वै-मासिक पत्रिका — मार्च-एप्रिल २०२६



गुरुजी कृष्णानंद (१९३९-२०१२)

## प्रकाश

प्रकाश, हा भौतिक प्रकाश नसून सूक्ष्म पातळीवरचा प्रकाश आहे, जो सर्व निर्मितीचा स्त्रोत आहे. प्रेम, शांती, सत्य, बुद्धी आणि सर्व जीवनाचा तो स्त्रोत आहे. हा प्रकाश म्हणजेच देव.

## प्रवहन

म्हणजे प्रकाशाला हेतूपुर्वक आपल्या शरीरात येण्याची अनुमती देऊन त्यानंतर पूर्ण जगात त्याला पसरविणे. आपले शरीर प्रकाशाला स्थूल पातळीत बदलते. ही प्रकाशाची कंपनं, सर्व प्राणिमात्र आणि निसर्गात पोहोचतात. त्यात प्रेम, शांती, सकारात्मकता आणि हीलिंग अशा वेगवेगळ्या शक्ती असतात, त्या परिवर्तनासाठी मदत करतात. माणसं अजून चांगली होतील आणि हे जग, एक अजून चांगली जागा असेल.

## तंत्र

तुमच्यावर प्रकाशाचा महासागर आहे अशी कल्पना करा. आता हा प्रकाश खाली येऊन तुमच्या पूर्ण शरीरात भरतो आहे अशी कल्पना करा. आता प्रेम, प्रकाश आणि शांती ह्याचा एक मिनीटभर अनुभव घ्या. आता कल्पना करा की हा प्रकाश हळूहळू तुमच्या शाळेत, परिसरात, राज्यात, देशात आणि मग संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्याचा कमीतकमी ७ मिनीटे सराव करा.

## प्रकाश प्रवहन जागतिक चळवळ

गुरुजी कृष्णानंद, संस्थापक सप्तर्षी मार्ग, ह्यांनी १८ मे २००८ रोजी ह्या चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे, रोज कमीतकमी ७ मिनिटांसाठी, झोपेतून उठल्यानंतर आणि झोपण्यापुर्वी, आपापल्या घरातून प्रकाश प्रवहन करणे. ह्या चळवळीचा मुख्य उद्देश, पृथ्वीवर शांतता नांदावी, हा आहे.

## चळवळीची खास वैशिष्ट्ये

- प्रकाशाने एकात्मता
- धर्मनिरपेक्ष, जागतिक
- कुठलेही नियम आणि अटी नाहीत
- कुठलेही सदस्यत्व नाही
- प्रत्येकजण शांततेसाठी योगदान देऊ शकतो
- वैयक्तिक आणि जागतिक मदत
- आपल्याला आणि जगाला नवीन युगात प्रवेश करण्यास मदत करते.

## संदेश

### गुरुजी कृष्णानंद

(Thus Spoke Guruji - Vol 5, ह्या पुस्तकातील, गुरुजींच्या २९ फेब्रु. २००४ च्या व्याख्यानातील वेचे)

अनुवादः मेधा कुलकर्णी

आपण देवाचा, त्याच्या अस्तित्वाचा अनुभव कसा घेऊ शकतो? आम्ही यावर चर्चा करत होतो आणि विचारांती लक्षात आले की आपण अनेक प्रकारे त्याचा अनुभव घेऊ शकतो. त्यापैकी एक प्रकार असा आहे – जेव्हा आपण ध्यान करत असतो, तेव्हा प्रकाशाच्या स्वरूपात आपण त्याला अनुभवतो. अनेक लोकांचे अनुभव मी ऐकले आहेत. जेव्हा आपण ध्यान करतो, तेव्हा कोणा एका टप्प्यावर, कधीतरी आपल्याला एक प्रकाश दिसतो. त्यावेळी आपण प्रकाश नुसता बघतच नाही, तर त्याचा अनुभव घेतो. कधीकधी आपणच प्रकाश बनतो. जेव्हा आपण प्रकाशाचा अनुभव घेत असतो, तेव्हा आपण प्रत्यक्ष परमेश्वराचाच अनुभव घेत असतो. जेव्हा आपण त्रासलेले नसतो, आपल्या मनात कोणतीही वाईट भावना नसते, कोणतीही तक्रार नसते, कोणतीही कुरकुर नसते, तेव्हा आपण देवाला शांतीच्या रूपात अनुभवतो. जेव्हा असीम शांत मन:स्थिती असते, तेव्हा तो देवाचा अनुभव असतो. आपण देवाला शांतीच्या रूपात अनुभवतो.

भव्यता, विशालता या रूपात सुद्धा आपण परमेश्वराचा अनुभव घेऊ शकतो. उदा० आकाशाचा विचार करा, आपण त्याची विशालता किंवा असीमता इतर पातळ्यांवरसुद्धा अनुभवू शकतो. आपण आपल्या विचारात व्यापकता आणू शकतो, आपल्या भावनांच्या कक्षा रुंदावू शकतो. जिथेजिथे अशी विशालता, व्यापकता असेल, तिथेतिथे परमेश्वराचे अस्तित्व असते.

## संस्मरणीय घटना

जयंत देशपांडे, अनुवादः वैशाली जोशी

महर्षी अमर अशा एका कार्यक्रमात उपस्थित होते, जेथे प्रकाश गुरुंनी नवयुग स्थापन करणाऱ्या प्रक्रियांची सुरुवात केली होती. आपण सध्या संक्रमणकालातून जात आहोत. नवयुग हे प्रेम आणि शांतीने भरलेले असेल. नकारात्मकतेचा कोणताही मागमूस राहणार नाही आणि खोटे बोलता येते हे लोकांना माहीत देखील नसेल. मानवी आध्यात्मिक प्रयत्नांनी आपण नवीन युगाच्या दिशेने जलद गतीने प्रगती करू शकतो. प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ हा आमचा त्या दिशेने केलेला एक प्रयत्न आहे. ह्या चळवळीला बळकटी देण्यासाठी १६व्या जागतिक प्रवहन दिनी एक मोठा आध्यात्मिक प्रयत्न करण्यात आला.

असा केलेला एकही प्रयत्न वाया जाणार नाही. नवयुग अवतरण्याची वाट पाहात आहे. ते प्रकट करण्यास सुरुवात करण्यासाठी आता आपण वाट पाहण्याची गरज नाही.

## प्रकाश प्रवहनाचे कार्य

मनोज चोप्रा, अनुवादः मेधा कुलकर्णी

संपूर्ण मानवजातीसाठी, ज्यांनी नि:स्वार्थीपणे काम केले, ते महर्षी अमर हे एक महान ऋषी होते. त्यांना आशा होती की १४४ साधक भविष्यात आपले कार्य पुढे नेतील. १४४जण नाही, तर कमीतकमी ७ जण तरी हे कार्य करतील. ७ नाही, तर कमीतकमी एक जण तरी ऋषींची अपेक्षा पूर्ण करेल अशी त्यांची अपेक्षा होती. समजा जर कोणीही ऋषींची अपेक्षा पूर्ण केली नाही, तर निदान आपण आपले कर्तव्य पूर्ण केले, या समाधानाने देह ठेवण्यासाठी ते तयार होते.

हे कार्य करताना प्रत्येक व्यक्तीप्रती कमालीचा संयम कसा ठेवावा आणि प्रत्येक व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य देऊन आपापल्या क्षमतेनुसार पुढे जाण्यासाठी कसे प्रेरित करावे, याबाबतीत त्यांनी आपल्या सखोल शिकवणीतून मार्गदर्शन केले. आपण आपले काम करावे आणि मानवजातीला आपापला मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

१६वा प्रकाश प्रवहन दिन अधिकाधिक जागरुकता, एकसंघता आणि सकारात्मक बदल संपूर्ण जगात घडवून आणो, ही अपेक्षा.

मानसा फाउंडेशन (र)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- ागलूर रोड), बंगलोर ५६००७७, भारत
फोनः ९९०००७५२८० (सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत)
इ-मेलः info@lightagemasters.com वेबसाइटः www.lightagemasters.com, www.lightchannels.com

## ऋषींची अनमोल वचनं

अनुवाद: भुवन दिवेकर

- जे लोक चढण्याचा प्रयत्न करतात, तेच पडतात. पायथ्याशी असणारे नेहमीच सुरक्षित असतात. ते कधीच पडणार नाहीत. जरी आपण पडलो, तरी आपण परत चढलं पाहिजे. जरी आपण अयशस्वी झालो, तरी आपण प्रयत्न करत राहिलं पाहिजे.
- आपण जर स्वत:ला आध्यात्माभोवती गुंफून घेतले, तर आपले बहुतेक प्रश्न किंवा जवळजवळ सगळेच प्रश्न, अगदी भौतिक प्रश्नसुद्धा सुटतील. वैयक्तिक पातळीवर आश्चर्यकारक गोष्टी घडतील.
- समर्पण म्हणजे देवाबरोबर पहिल्यांदा प्रेमाचा धागा विणणे, देवाला आपल्या आयुष्यात साथीदार बनवणे, त्याच्याशी तादात्म्य साधणे आणि २४ तास त्याच्या मार्गदर्शनाखाली जगणे होय. समर्पण म्हणजे आपला अहंकार बाजूला ठेवून आपलं आयुष्य देवाने व्यापून टाकावं म्हणून त्याला आमंत्रित करणे होय. हेच समर्पण आहे.
- ताणतणाव हे घाबरून जाण्याचं लक्षण आहे. आपण ताणाखाली तेव्हा येतो, जेव्हा आपल्याला असहाय्य वाटतं, असलेल्या परिस्थितीमधून बाहेर निघण्याचा मार्ग दिसत नाही, तिला सामोरं जाण्याचं धैर्य आपल्यात नसतं, निराशा वाटते किंवा परिणामांबद्दल आपण साशंक असतो. ताणतणाव असणं हे नैसर्गिक आहे.
- जेव्हा तुम्ही ताणतणावग्रस्त असता, तेव्हा कल्पना करा की प्रकाशाचा एक किरण तुमच्या डोक्यात प्रवेश करत आहे. हा साधासुधा प्रकाश नाही. ह्या दैवी प्रकाशात आपल्याला आवश्यक असलेली सर्व मदत सामावलेली आहे. त्यात आपल्याला आवश्यक ती माहिती, सल्ला, उपाय आणि उत्तरं हे सगळं असतं. इतकंच नाही, तर आपल्याला पुरेशी शक्ती देण्यासाठी लागणारी ऊर्जासुद्धा भरपूर प्रमाणात त्याच्याकडे आहे. परिस्थितीला सामोरं जाऊन त्यातून बाहेर येण्यासाठी लागणारी शक्ती प्रकाश आपल्याला देतो.
- आपण परिणामांबद्दल फार काळजी करत नसू, एखाद्या तणावग्रस्त परिस्थितीच्या निष्पत्तीबद्दल आपण चिंतित नसू, तर खूप आराम मिळू शकतो. आपल्याला त्रास होत नाही, काळजी वाटत नाही, कारण जेव्हा आपण आपली समस्या देवासमोर मांडतो, तेव्हा आपल्याला माहिती असते की तो आपली काळजी घेतो आहे. आपल्याला हे माहिती असतं की जे काही निष्पन्न होईल, ते चांगल्यासाठीच असेल.

– गुरुजी कृष्णानंद

## १६व्या जागतिक प्रवहन दिवसाचे फोटो



जागतिक प्रकाश प्रवहन दिनी **ब्रोकरेज फ्री** येथील कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन मार्गदर्शित प्रकाश प्रवहन सत्रात भाग घेतला



फोटो १: प्रकाश प्रवहन तंत्राचे चित्र रेखाटले, फोटो २, ३: बेंगळूरु येथे विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहन केले, फोटो ४: कृतज्ञता आणि आदराने महर्षी अमरांना पुष्पांजली अर्पण करताना विद्यार्थी



बेंगळूरुमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी जागतिक प्रवहन दिनी प्रकाश प्रवहन करून मूकपणे आपला सहभाग नोंदवला

## १६वा जागतिक प्रकाश प्रवहन दिन – एक वृत्तांत

मनोज चोप्रा, अनुवादः मेधा कुलकर्णी

माझा नेहमी असा विश्वास राहिला आहे की जर खूप मोठे ध्येय साध्य करायचे असेल, तर खूप लोक लागतात, असे नाही; तर एकाग्रतापूर्वक, निष्ठेने आणि मनापासून काम करणारे थोडे लोक पुरेसे होतात, जे कामाचे महत्त्व समजतात, आणि जे स्वतःला त्या कामाशी जोडून घेतात. आमच्या स्वयंसेवकांमध्ये हे सर्व गुण आहेत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुरुजी कृष्णानंद आणि महर्षी अमर यांनी जे ध्येय ठेवले होते, ते आमच्या स्वयंसेवकांनी पूर्णपणे स्वतःमध्ये बिंबवले आहे. १६वा जागतिक प्रकाश प्रवहन दिन हा त्यांनी बघितलेल्या स्वप्नांची, ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक मोठे पाऊल आहे.

संपूर्ण जगामध्ये शांती प्रस्थापित व्हावी, यासाठी ३० जानेवारी २०२६ रोजी जागतिक प्रकाश प्रवहन दिन साजरा करण्यात आला. सुमारे शंभर स्वयंसेवकांनी अथकपणे काम करून जवळजवळ ७ लाख मुलांकडून प्रकाश प्रवहन करून घेतले. आमच्या समाजमाध्यमांविषयक गटाने अतिशय काळजीपूर्वक नियोजन केल्यामुळे हजारो लोक ऑनलाईन कार्यक्रमात सामील झाले. हा दिवस व्यवस्थितपणे पार पडला, त्यामागे पडद्याआड भरपूर काम करणारे अनेक हात होते. जास्त प्रकाश खाली आणून जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी संपूर्ण मानसा कुटुंबाचा हा मनापासून आणि एकत्रितपणे केलेला प्रयत्न होता.

सिंहावलोकन करण्यासाठी १६ वर्षांचा काळ योग्य आणि पुरेसा वाटतो! जग कदाचित तसेच दिसत असेल – हिंसा, भ्रष्टाचार, इत्यादी अजूनही आधीसारखेच आहे! एखाद्याला प्रश्न पडू शकतो की, लाखो मुले आणि प्रौढांनी केलेल्या प्रकाश प्रवहनाचा प्रभाव पडला आहे का? घडणारे बदल प्रत्यक्षात कुठे दिसत आहेत? पण सत्य असे आहे की प्रकाशाचा नेहमीच प्रभाव पडतो, पण तो प्रभाव भौतिक पातळीवर लगेच दिसेल, असे नाही. प्रकाश आपल्याला परिवर्तित होण्याची संधी देतो. पण आपण अद्याप तयार नाही, कारण आपण आपला अहंकार जपण्यासारख्या क्षुल्लक बाबीत गुंतलेले आहोत. प्रकाश हा अतिशय सूक्ष्म पातळीवर काम करतो आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम दिसायला वेळ लागतो. आपण हे लक्षात घ्यायला हवे की प्रकाश कोणावरही बदल लादत नाही. बदल प्रत्यक्ष दिसण्यासाठी आपण आपले जुने मार्ग सोडून दिले पाहिजेत आणि बदल स्वीकारले पाहिजेत. आपल्याला वाटते की नवीन युग कुठून तरी बाहेरून अवतरित होईल, पण ते आपल्या अंतर्यामी अवतरते. जसजसे जास्तीतजास्त लोक प्रकाशाबाबत जागरूक होतील, तसतसे नवीन युग आपल्यामधूनच उलगडत जाईल.

समाजमाध्यमांना सनसनाटी आणि नकारात्मक बातम्यांमध्ये रस असतो आणि ते फक्त त्यांनाच महत्त्व देतात. तरीसुद्धा, जर आपण नीटपणे निरीक्षण केले, तर या सगळ्या गोंधळातूनसुद्धा सत्य बाहेर येताना दिसेल. अनेक शांत परंतु लक्षवेधी आध्यात्मिक बदल घडून येत आहेत. या बदलांचा प्रभाव जाणवण्यासाठी गरज आहे, ती संयमाची आणि आध्यात्मिक विवेकाची. या पातळीवर बदल होण्यासाठी मानवजातीने स्वतःला तयार करायला हवे. सूक्ष्म गुरु मानवजातीने पुढचे पाऊल उचलण्याची धीराने वाट पहात आहेत.

जागतिक प्रवहन दिन यशस्वी होण्यामागे आमच्या स्वयंसेवकांचे निःस्वार्थ प्रेम व जिव्हाळा, आणि कमालीची निष्ठा आहे. शिक्षक, विद्यार्थी, शाळेचा अधिकारी वर्ग आणि हजारो लोक, जे त्या दिवशी ऑनलाईन सत्रांमध्ये सहभागी झाले, त्यांचे आम्ही अत्यंत कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. ते सर्व खऱ्या अर्थाने आमचे काम आणि आमचे ध्येय जाणतात आणि त्याला प्रतिसाद देतात. मला अगदी पक्का विश्वास आहे की मोठमोठी कामे एकट्या माणसाकडून यशस्वी होत नाहीत, तर तो एकत्रितपणे आणि संघभावनेने अनेकांनी केलेल्या कामाचा परिणाम असतो.

आमची कृतज्ञता गुरुजींच्या चरणापाशीसुद्धा आहे की ज्यांनी आम्हाला हे अतिशय समाधानकारक असे प्रकाश प्रवहनाचे काम देऊन आशीर्वाद दिला. या कामाने आमच्या आयुष्याला, आमच्या जगण्याला अर्थ तर दिलाच, हेतूही दिला पण त्याचबरोबर आम्हाला अधिक उच्च पातळीवर असलेल्या महात्म्यांचे जागतिक शांतीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हातभार लावता आला आहे. या महान् हेतूसाठी आपण एकत्रितपणे पुढे जात राहू या आणि दररोज प्रकाश प्रवहन करणे सुरू ठेवू या. ■

### शाळांना आवाहन

जागतिक प्रकाश प्रवहन चळवळीला सशक्त करण्यासाठी, सकाळच्या प्रार्थनेच्या आधी किंवा पहिल्या तासाच्या आधी, ३ ते ७ मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करावा.

### शाळांमधील प्रकाश प्रवहन

| | |
|---|---|
| सहभागी शाळा | : ६१७५ |
| प्रकाश प्रवहन केलेले विद्यार्थी | : ३०.९८ लाख |
| नियमित प्रकाश प्रवहन करणाऱ्या शाळा | : : ५०८ |
| नियमित प्रकाश प्रवहन करणारे विद्यार्थी | : २.२१ लाख |

दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी सकाळी ११ ते ११.३० पर्यंत **प्रकाश प्रवहनाचे मार्गदर्शित ऑनलाईन सत्र** आयोजित करण्यात येईल, जे सर्वांसाठी खुले असेल. खाली दिलेल्या लिंकद्वारे ह्या सत्रात सहभागी होता येईलः

www.lightagemasters.com

नियमित प्रकाश प्रवहनाचा लाखो लोकांना फायदा झाला आहे. अनेकांना कल्पनातीत मदत मिळाली आहे आणि सुंदर अनुभव आले आहेत. तुमचा अनुभव दुसऱ्यांना प्रेरणा देऊ शकतो आणि मार्गदर्शक ठरू शकतो. कृपया आपला अनुभव आम्हाला कळवा.



info@lightagemasters.com

अनेक मुलं, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे अनुभव “Experiences of Light Channels” ह्या पुस्तकात संकलित केले आहेत. पहिला खंड प्रकाशित झाल्यावर अनेकांनी त्यांचे अनुभव आम्हांला सांगितले, म्हणून दुसरा खंड प्रकाशित केला. तुम्हाला हे दोन्ही खंड आमच्या संकेतस्थळावरून निःशुल्क डाऊनलोड करता येतील.

www.lightchannels.com





## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

(संकलन: वैशाली जोशी, अनुवाद: प्रतिभा ओक, पद्मजा बाजपेयी)

बेंगळुरुमधील साथनूर येथील करियप्पा मेमोरियल स्कूलमध्ये आम्ही इयत्ता तिसरी आणि त्यावरील वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी 'प्रकाश प्रवहन' सत्र घेतले. मुले डोळे मिटून सात मिनिटे शांत बसली. सत्रानंतर, संपूर्ण शाळेचे वातावरण सकारात्मकतेने भरले होते. ते खूप आनंदी होते आणि म्हणाले, की हे ध्यान किती शक्तीशाली आहे हे त्यांना फक्त सात मिनिटांत अनुभवता आले. हे तंत्र शिकवल्याबद्दल मुख्याध्यापकांनी शाळेच्यावतीने मनापासून आभार व्यक्त केले. ते म्हणाले की हे शाळेतील सर्व मुलांसाठी खूप उपयुक्त आहे.

सरकारी प्राथमिक शाळा, कोडिहळ्ळी, कनकपुरा (सेन्टेनरी स्कूल) मध्ये, विद्यार्थी आणि शिक्षक दोघांनीही मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने प्रकाश प्रवहनाचा सराव केला. सत्रानंतर, मुले माझ्याभोवती गोळा झाली आणि म्हणाली की हे तंत्र खरोखरच अद्भुत आहे आणि ते खूप आनंदी आहेत. त्यांनी मला पुन्हा एकदा त्यांच्या शाळेला भेट देण्याची विनंती केली आणि सांगितले की पुढच्या वेळी ते आणखी चांगल्या प्रकारे सराव करतील.

शिक्षकांनीसुद्धा मला पुन्हा शाळेला भेट देण्यास सांगितले आणि म्हणाले, "हे आमच्या मुलांसाठी खूप उपयुक्त ठरले आहे. हे खरोखरच एक अद्भुत ध्यान आहे."

मुलांमध्ये दिसणारा आनंद मला एक अविस्मरणीय उत्सव वाटला. मला खूप आनंद झाला आणि मला अशी अद्भुत संधी दिल्याबद्दल मी प्रकाश गुरुंचे मनापासून आभार मानले.

– नागरत्ना के. एस्., प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

प्रकाश प्रवहनाच्या सरावानंतर माझे मन ताजेतवाने होते. मला जाणवते की एक अदृष्य ऊर्जा माझ्या शरीरात प्रवेश करते. आता मला अभ्यासात अधिक रस वाटतो आहे.

– पृथ्वी एच्. एस्., इयत्ता दहावी, बापू हायस्कूल, यशवंतपूर, बेंगळूरु

नित्य ज्योती पब्लिक स्कूल, मल्लसंद्रा येथील एका विद्यार्थिनीने तिचा अनुभव सांगितला. ती दररोज प्रकाश प्रवहन करते. पुर्वी ती छोट्या छोट्या गोष्टींसाठी घाबरत असे, पण आता ती यावर मात करू शकली आहे व ती आता जे काही करते, ते आत्मविश्वासाने करते.

– चंद्रकला डी., प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

केंद्रीय विद्यालय प्राथमिक शाळा, पिकेट, सिकंदराबाद येथील बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहनाच्या सत्रानंतर त्यांचे अनुभव सांगितले. एक विद्यार्थी म्हणाला की त्याला खूप उत्साही वाटत आहे. अजून एकाला तणावमुक्त वाटले. आणि बऱ्याच विद्यार्थ्यांनी सांगितले की त्यांना शांतता जाणवली.

– जयश्री वासुदेव, प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

कुवेंपु स्मारक विद्या केंद्र, व्हाईटफिल्ड, बेंगळूरु येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रकाश प्रवहन सत्रात आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहन केले. सत्रानंतर एका विद्यार्थिनीने सांगितले की सत्राच्या वेळी तिला सकारात्मक ऊर्जा तिच्या आयुष्यात येत आहेत व नकारात्मक ऊर्जा कमी होत आहेत असे जाणवले. अजून एक विद्यार्थी म्हणाला की त्याच्या मनातील नकारात्मक विचार अस्पष्ट झाले आहेत आणि आता सकारात्मक विचार व ऊर्जा त्याच्या मनात आहेत.

– कल्पना राजशेखर, प्रकाश प्रवहन स्वयंसेवक




प्रकाश प्रवहन हे मराठी द्वै-मासिक असून, त्याचे वितरण हे खाजगी आहे. मानसा फाउंडेशन (र) तर्फे प्रकाशन, मुद्रण आणि संपादकीय काम हे जयंत देशपांडे बघतात. प्रकाशन मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर- बागलूर रोड), बंगलोर - ५६००७७, येथून आणि मुद्रण मे. जोस्को प्रिंटर्स, राममूर्तिनगर, बेंगळूरु ५६००१६. मालकी हक्क: मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर-बागलूर रोड), बेंगळूरु ५६००७७ संपादक: जयंत देशपांडे